पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक – १७

सभावृत्तांत

दिनांक – २०.०५.२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे-२०१३ ची मा.महापालिका सभा सोमवार दि.२०.०५.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७. मा.थोरात वनिता एकनाथ
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१८. मा.उल्हास शेट्टी
१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२०. मा.पवार संगीता शाम

२१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२३. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२५. मा.भारती फरांदे
२६. मा.आर.एस.कुमार
२७. मा.जावेद रमजान शेख
२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३०. मा.नंदा विकास ताकवणे
३१. मा.नेटके सुमन राजेंद्र
३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३३. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३४. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३५. मा.लोंढे गणेश नारायण
३६. मा.शमीम पठाण
३७. मा.▪†›.संदीप गुलाब चिंचवडे
३८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३९. मा.अपर्णा निलेश डोके
४०. मा.अनंत सुभाष को-हाळे
४१. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४२. मा.प्रसाद शेट्टी
४३. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४४. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४५. मा.शेख अस्लम शैकत
४६. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४७. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४८. मा.वाबळे संजय मल्हारराव
४९. मा.मडिगेरी वर्षा विलास
५०. मा.सौ.गवळी सुनिता (ताई) पांडूरंग

५१.मा.सुपे आशा रविंद्र
५२.मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५३.मा.अजित दामोदर गव्हाणे
५४.मा.गोफणे अनुराधा देविदास
५५.मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५६.मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५७.मा.महेशदादा किसन लांडगे
५८.मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५९.मा.लोंढे शुभांगी संतोष
६०.मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६१.मा.ननवरे जितेंद्र बाबा
६२.मा.सावळे सिमा रविंद्र
६३.मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६४.मा.भोसले राहूल हनुमंतराव
६५.मा.पालांडे सुजाता सुनिल
६६.मा.बहल योगेश मंगलसेन
६७.मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६८.मा.कदम सदगुरु महादेव
६९.मा.गिता सुशील मंचरकर
७०.मा.कैलास महादेव कदम
७१.मा.छाया जगन्नाथ साबळे
७२.मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
७३.मा.वाघेरे सुनिता राजेश
७४.मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७५.मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७६.मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७७.मा.काळे विमल रमेश
७८.मा.पाडाळे निता विलास
७९.मा.विनोद जयवंत नढे
८०.मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८१. मा.कैलास गबाजी थोपटे
८२. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८३. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
८४. मा.बारणे माया संतोष
८५. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८६. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८७. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८८. मा.कलाटे स्वाती मयुर
८९. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९०. मा.चौंधे आरती सुरेश
९१. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
९२. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९३. मा.जवळकर वैशाली राहुल
९४. मा.जगताप राजेंद्र गणपत
९५. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९६. मा.जगताप नवनाथ दत्तु
९७. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
९८. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
९९. मा.जम सोनाली पोपट
१००. मा.प्रशांत शितोळे
१०१. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१०२. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०३. मा.गायकवाड संध्या सुरदास
१०४. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०५. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०६. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०७. मा.संजय केशवराव काटे
१०८. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१०९. मा.पाटील सुजित वसंत
११०. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१११. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.झुरे-सहआयुक्त, मा.पवार, मा. कुलकर्णी, मा.टेकाळे, सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक,मा.गावडे-नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.काची-सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गायकवाड- प्र. आरोग्य वैद्य. अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम,मा.सवणे मा.शरद जाधव, मा.साळवी, मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.तांबे, मा.पिरजादे, मा.सय्यद - कार्य.अभियंता, मा.पवार - प्र.कायदा सल्लागार, मा.जरांडे - सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौरः-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(श्री.सिंघम तुलसानी, श्री.हिंगळे, श्री.तात्यासाहेब हुगळे, श्री.श्रेया पवार यांचा मा.महापौर, मा.अति.आयुक्त, मा.पदाधिकारी, मा.गटनेते, मा.नगरसेवक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.)

-----------

(१) सन २०१३-२०१४ च्या मंजूर अंदाजपत्रकातील समाविष्ट नविन विकास कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ६७ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(२) पिंपरी चिंचवड शहरातून पवना,मुळा व इंद्रायणी नदीचे पात्र स्वच्छ करुन नदीची वहन क्षमता वाढविणेच्या कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ६७ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.सुजाता पाडाळे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक - २०/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१अ/कावि/२८/२०१३ दि.८/१/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १५/०१/२०१३ ठराव क्र.२४२३ नुसार

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४० दि.२२/०३/२०१३

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.२६३ दि.०९/०५/२०१३

मनपा परिसरातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी महापालिका क्षेत्रात एक विशेष पोलिस ठाणे प्रत्येक अ ,ब ,क ड प्रभागासाठी चार पोलिस चौक्या याकरिता पदे निर्मिती करणेकामी प्रस्तावात नमुद परिशिष्ट अ प्रमाणे ७८ पदे,परिशिष्ट ब प्रमाणे २८ पदे अशी एकूण १०६ पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण केली जाणार असून त्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती आगावू **(Advance Payment)** च्या स्वरूपात मनपाने करावयाची असून ही बाब विचारात घेता अ(प्रस्तावात नमुद शासन निर्णयात नमुद केलेल्या आणि मनपासाठी अनुज्ञेय असलेल्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते ,निवृत्तीवेतन अंशदान होणा-या खर्चास व सदर खर्चाची रक्कम आगावू तिमाही हप्त्याच्या स्वरूपात राज्य शासनाकडे/संबंधीत पोलिस आयुक्तालयाकडे भरण्यास ब(सदर अधिकारी व कर्मचारी यांना पुरविण्यात येणा-या वाहन ,कार्यालय व इतर सुविधांवर येणा-या खर्चास व तो शासनाकडे/संबंधीत विभागाच्या पोलिस आयुक्तांकडे आगावू स्वरूपात भरण्यास क(सदर कक्षाच्या निर्मितीमुळे होणा-या खर्चाची पुर्तता करण्यासाठी मनपाच्या अंदाजपत्रकात नवीन लेखाशिर्षे निर्माण करून त्याखाली आवश्यक तरतूद प्रतिवर्षी करण्यास मान्यता देणेत येत आहे .

**मा.आशा सुपे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आपण मागच्या वेळेला या विषयासंदर्भात खडाजंगी होणार होती. सभागृहासमोर माहिती घेऊन विषय आणावा.

तशी प्रशासनाने तयारी केलेली दिसत नाही. पुन्हा तसाच विषय आलेला दिसतोय. म्हणून हा विषय तहकूब करण्यात यावा.

**मा.उल्हास शेटटी** - सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रमांक १ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - २८७ विषय क्रमांक - १
दिनांक -२०/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र प्रशा/१अ/कावि/२८,
दिनांक ८/१/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १५/०१/२०१३ ठराव क्र.२४२३ नुसार
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४० दि.२२/०३/२०१३
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.२६३ दि.०९/०५/२०१३

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ६७ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.सुजाता पलांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २
दिनांक - २०/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भूजि/१/कावि/१३६/२०१३
दि.१०/०४/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १६/०४/२०१३ ठराव क्र.३२७७

नुसार

प्रस्तावासोबत जोडलेल्या पिंपरी चिंचवड मनपा भूमि जिंदगी विभागाच्या मिळकत वाटप नियमावली २०१३ यास मान्यता मिळणेकामी व त्यानुसार शासनास सादर करणेकामी सदरच्या विषयास मान्यता देणेत येत आहे.

**मा.आशा सुपे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, भूमि आणि जिंदगी विभागाची मिळकत वाटप नियमावली दिलेली आहे. त्याबद्दल मला काही बोलायचे नाही. मिळकतींचे भाडे कुठे वसूल होत नाही. सध्या आपण बघितले, अ,ब,क,ड या चार प्रभागांची मिळून ४ १/२ कोटींवर थकबाकी आहे. भाडे वसूल करणा-या माणसाने ते वसूल केले नाहीतर त्याच्यावर काय कारवाई करणार? काही संस्थांची १ कोटी थकबाकी आहे. अनेक ठिकाणी १७ लाख, २० लाख, १५ लाख थकबाकी आहे. मला विनंती करायची आहे, २,३,४,५,६ महिने भाडे भरले नसेल तर काय ॲक्शन घेता. काही ठिकाणी अडीच वर्षे वसूली केलेली नाही. असे कसे चालते. स्वतः मालक असालतर सगळे भाडे वसूल करतो. ते वसूल न करणा-या अधिका-यावर काय कारवाई करणार? भाड्याने दिल्यावर ३/४ महिने भाडे भरले नाहीतर त्याला परत नोटीस पाठवायची व ताबा घ्यायला पाहीजे. हा महापालिकेचा पैसा आहे. भाडे का वसूल केलेले नाही याचे त्यांनी उत्तर दिले पाहीजे.

**मा.श्रीरंग बारणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब खरे तर मी जास्त बोलणार नाही. मिळकतीच्या अनुषंगाने उत्तर हवे आहे. महापालिकेच्या अशा किती मिळकती आहेत ज्या भाडयाने दिलेल्या नाही. त्यांचा वापर सुद्धा होत नाही. हे सभागृहाला सांगावे. भूमि आणि जिंदगी विभागाच्या ब-याचशा मिळकती आहेत त्यांची दुरावस्था वाईट आहे. कोटयावधी खर्च केलेला आहे त्यावर त्या मिळकती भाड्याने जात नाहीत. त्यांचा वापर सुद्धा होत नाही. बरेचशे अवैध व्यवहार चालू आहेत. महापालिकेच्या अशा किती मिळकती आहेत, ज्या मिळकती इमारत बांधल्यापासून आजतागायत आपण भाडयाने दिल्या नाहीत व त्यांचा वापर सुद्धा केलेला नाही.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जी माहिती विचारली आहे त्याला अवधी लागणार आहे. याबाबत माहिती गोळा करण्यासाठी सांगावे व हा विषय तहकूब करण्यात यावा अशी विनंती आहे.

**मा.उल्हास शेटटी** - मा.महापौर साहेब सदर ठरावास अनुमोदन देतो.

**मा.महापौर :-** विषय क्रमांक २ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - २८८ विषय क्रमांक - २
दिनांक -२०/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र भूजि/१/कावि/१३६/२०१३,दिनांक १०/४/२०१३.
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १६/०४/२०१३ ठराव क्र.३२७७ नुसार

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
अनुकूल - ६७ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पलांडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - २८९ विषय क्रमांक - ३
दिनांक - २०/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र लेखा/६/कावि/८६१/२०१३ दि.०९/०४/२०१३.
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक २३/०४/२०१३ ठराव क्र.३२८९ नुसार

सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात जकात विभागाकडील महसुली भाग-१ जमा खर्च भाग-३ जमा-खर्च यात तरतुदींमध्ये एकुण रक्कम कमी/जास्त होत नाही. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात निश्चित केलेली रक्कम र.रु. १२,००,३०,००,०००/- एवढीच राहते. तरी खालीलप्रमाणे नवीन लेखाशिर्ष व तरतुदींमधील बदल करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**(अ) महसुली जमा**

| अ. क्र. | लेखाशिर्ष | सन २०१३-१४ अंदाजपत्रकात तरतुद | कपात सुचविलेली रक्कम | सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात सुचविलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | आयातकर (अनामत परतावा) १०% वसुली सह | ११,५७,९३,५५,०००/- | ११,०७,९३,५५,०००/- | ५०,००,००,०००/- |
| २ | इतर जमा | २,२०,०००/- | १,२०,०००/- | १,००,०००/- |
| ३ | एस्कॉर्ट | ४०,००,००,०००/- | १८,००,००,०००/- | २२,००,००,०००/- |
| ४ | रहदारी पास | १,५०,००,०००/- | १,५०,००,०००/- | ० |
| ५ | लेखनिक खर्च वसुली | ७,१५,०००/- | ७,१५,०००/- | ० |
| ६ | इकरार पत्र | ६०,००,०००/- | ६०,००,०००/- | ० |
| ७ | शुल्कबंध वखार परवाना फी | २,२०,०००/- | २,२०,००० | ० |
| ८ | जी.सी. मुदतवाढ | ९,९०,०००/- | ९,९०,०००/- | ० |
| ९ | जकात अनामत जमा | ५,००,०००/- | ५,००,०००/- | ० |
| **(ब)** | **महसुली खर्च** | | | |
| | वाहन भाडयाने घेणे | ४०,००,०००/- | २,००,०००/- | ३८,००,०००/- |
| **(क)** | **भाग – ३ जमा** | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | जकात अनामत | ७०,००,००,०००/- | १०,००,०००/- | ६९,९०,००,०००/- |
| **(ड)** | **भाग – ३ खर्च** | | | |
| | अनामत परतावा | ७०,००,००,०००/- | १०,००,०००/- | ६९,९०,००,०००/- |

वरील प्रमाणे जकात लेखाशिर्षावरील रक्कमा कपात व रद्द करुन सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात स्थानिक संस्था कर म्हणुन खालील प्रमाणे रक्कमा व लेखाशिर्ष निर्माण करणे आवश्यक आहे.

**अ) <u>महसुली जमा</u>** :-

१) स्थानिक संस्था कर :- ११,२८,२८,००,०००/-

२) शुल्क (नोंदणी फी दुबार पत्र) :- १,००,०००/-

--------------------

**ब) <u>महसुली खर्च</u>** :-

१) स्थानिक संस्था कर परतावा :- २,००,०००/-

--------------------

**क) <u>महसुली जमा</u> :-**

१) स्थानिक संस्था कर प्रतिभुती :- १०,००,०००/-

रक्कम (सिक्युरिटी डिपॉझीट)

--------------------

**ड) <u>महसुली खर्च</u> :-**

१) स्थानिक संस्था कर प्रतिभुती :- १०,००,०००/-

रक्कम परतावा (सिक्युरिटी डिपॉझीट

--------------------

**मा.आशा सुपे** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६७ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पलांडे**- महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ४

दिनांक - २०/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८१ दिनांक ०६/०३/२०१३

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४७ दि.२२/३/२०१३

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.२७५ दि.०९/०५/२०१३

मंजूर विकास योजनेतील मौजे थेरगांव हद्यीतील सर्व्हे नं.३३ ते ३६ पै. मधून मोरया मंगल कार्यालयाकडे जाणा-या २४ मी. रुंद रस्त्यापासून थेरगांव स्मशानभूमी पर्यंत १२ मी. रुंद रस्ता व स्मशानभूमी ते थेरगांव गावठान २४ मी. रस्त्यापर्यंत सध्या अस्तित्वातील रस्ता ९ मी. रस्ता रुंद केल्यास नागरिकांची स्मशानभूमीकडे जाण्यासाठी त्या भागातील नागरिकांना रस्त्याची सोय होणार असल्याने सदरचा रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस तसेच मंजूर विकास योजनेतील मौजे थेरगांव हद्दीतील सर्व्हे नं.२५ व ३० मधून जाणारा १२ मीटर रस्ता सर्व्हे नं. २५ मध्ये अस्तित्वातील रस्त्याजवळ वाकडया वळणाचा असल्याने सदरचा रस्ता वाहतूकीच्यादृष्टीने सरळ करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.आशा सुपे** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.अरुण बो-हाडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो –

मौजे थेरगांव येथिल मंजुर विकास योजनेव्यतिरिक्त नागरीकांचे सोयीसाठी खालीलप्रमाणे नमूद केलेले रस्ते मुंबई प्रांतिक अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी काही भागात वस्ती झालेली आहे. त्यामुळे नागरीकांना जाणे येणे करीता रस्त्याची आवश्यकता आहे.

१) थेरगांव गावठाण ते बिर्ला हॉस्पिटलकडे जाणारा २४.० मी. रस्ता गोयल स्किमपासून नाल्याच्या दक्षिण बाजूने स.न.३६ व २ मधून ते थेरगाव स्मशानभूमीपर्यंत १२.० मी. रुंद रस्ता नव्याने करणे (अंदाजे लांबी ७०० मी.)

२) गोयल स्किम पासून नाल्याच्या दक्षिण बाजूने स.नं.३६ व २ मधून थेरगाव स्मशान भूमी जोडणारा १२.० मी. रुंद रस्ता ते स.नं.१,२ व ३७ मधून जाणा-या नाल्याच्या पूर्वीकडून असलेला कच्चा रस्ता स.नं.३८ मधिल शाळेपर्यंत ९.० मी. रुंद रस्ता नव्याने करणे. (अंदाजे लांबी ३०० मी.)

३) थेरगांव स्मशान भूमी पासून स.नं. ४ थेरगांव गावठाण मधून ते २४.०० मी. रस्त्यापर्यंत ९.० मी. रुंद रस्ता करणे (अंदाजे लांबी २७५ मी.)

४) थेरगांव स्मशान भूमी पासून स.न.४ थेरगांव गावठाण स.न. ९ व ४ च्या हद्दीलगत स.न.९ मधून ते २४.०० मी. रस्त्यापर्यंत जोडणारा ९.० मी. रुंद रस्ता करणेस (अंदाजे लांबी ३७५ मी.) मान्यता देणेत यावी.

**मा.गोरक्ष लोखंडे** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पलांडे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - २९० विषय क्रमांक - ४

दिनांक - २०/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.नारायण बहिरवाडे, मा.प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.८१ दिनांक ०६/०३/२०१३
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.२४७ दि.२२/३/२०१३
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.२७५ दि.०९/०५/२०१३

मंजूर विकास योजनेतील मौजे थेरगांव हद्यीतील सर्व्हे नं.३३ ते ३६ पै. मधून मोरया मंगल कार्यालयाकडे जाणा-या २४ मी. रुंद रस्त्यापासून थेरगांव स्मशानभूमी पर्यंत १२ मी. रुंद रस्ता व स्मशानभूमी ते थेरगांव गावठान २४ मी. रस्त्यापर्यंत सध्या अस्तित्वातील रस्ता ९ मी. रस्ता रुंद केल्यास नागरिकांची स्मशानभूमीकडे जाण्यासाठी त्या भागातील नागरिकांना रस्त्याची सोय होणार असल्याने सदरचा रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस तसेच मंजूर विकास योजनेतील मौजे थेरगांव हद्दीतील सर्व्हे नं.२५ व ३० मधून जाणारा १२ मीटर रस्ता सर्व्हे नं. २५ मध्ये अस्तित्वातील रस्त्याजवळ वाकडया वळणाचा असल्याने सदरचा रस्ता वाहतूकीच्यादृष्टीने सरळ करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. मौजे थेरगांव येथिल मंजुर विकास योजनेव्यतिरिक्त नागरीकांचे सोयीसाठी खालीलप्रमाणे नमूद केलेले रस्ते मुंबई प्रांतिक अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी काही भागात वस्ती झालेली आहे. त्यामुळे नागरीकांना जाणे येणे करीता रस्त्याची आवश्यकता आहे.

१) थेरगांव गावठाण ते बिर्ला हॉस्पिटलकडे जाणारा २४० मी. रस्ता गोयल स्किमपासून नाल्याच्या दक्षिण बाजूने स.न.३६ व २ मधून ते थेरगाव स्मशानभूमीपर्यंत १२.० मी. रुंद रस्ता नव्याने करणे (अंदाजे लांबी ७०० मी.)

२) गोयल स्किम पासून नाल्याच्या दक्षिण बाजूने स.नं.३६ व २ मधून थेरगाव स्मशान भूमी जोडणारा १२.० मी. रुंद रस्ता ते स.नं.१,२ व ३७ मधून जाणा-या नाल्याच्या पूर्वीकडून असलेला कच्चा रस्ता स.नं.३८ मधिल शाळेपर्यंत ९.० मी. रुंद रस्ता नव्याने करणे. (अंदाजे लांबी ३०० मी.)

३) थेरगांव स्मशान भूमी पासून स.नं. ४ थेरगांव गावठाण मधून ते २४.०० मी. रस्त्यापर्यंत ९.० मी. रुंद रस्ता करणे (अंदाजे लांबी २७५ मी.)

४) थेरगांव स्मशान भूमी पासून स.न.४ थेरगांव गावठाण स.न. ९ व ४ च्या हद्दीलगत स.न.९ मधून ते २४.०० मी. रस्त्यापर्यंत जोडणारा ९.० मी. रुंद रस्ता करणेस (अंदाजे लांबी ३७५ मी.) मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ६७ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पलांडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - २०/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/३०१/२०१३ दि.६/२/२०१३.

२) मा.क्रीडा समिती सभा दिनांक २१/२/२०१३ ठराव क्र.४७ .

३) मा.विधी समिती सभा दिनांक १/३/२०१३ रोजी ठराव क्र.१२४

४) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३०६९ दिनांक १२/३/२०१३

५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/६१५/१३ दि.१९/३/२०१३

६) मा.महापालिका सभा ठराव क्र.२८३ दि.०९/५/२०१३

प्रस्तावात सविस्तर क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-अ ,क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ब ,क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-क ,क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ड ,मध्ये नमुद केलेप्रमाणे मनपा क्रिडा धोरण मसुद्यास तसेच ३ डिसेंबर अपंग दिनानिमित्त अंध ,अपंग ,व मतिमंद विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करणेकामी परिशिष्ट

अ/ब मध्ये नमूद तपशिलाचा मूळ धोरण मसुद्यात समावेश करून परिपूर्ण क्रीडा धोरण मसुद्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.संध्या गायकवाड** – मा.महापौर साहेब ठरावाला अनुमोदन देते.

**मा.आशा सुपे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे** – सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - २९१ विषय क्रमांक - ५
दिनांक - २०/५/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/३०१/२०१३ दि.६/२/२०१३.
२) मा.क्रीडा समिती सभा दिनांक २१/२/२०१३ ठराव क्र.४७ .
३) मा.विधी समिती सभा दिनांक १/३/२०१३ रोजी ठराव क्र.१२४
४) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३०६९ दिनांक १२/३/२०१३
५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/६१५/१३ दि.१९/३/२०१३
६) मा.महापालिका सभा ठराव क्र.२८३ दि.०९/५/२०१३

विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत येत आहे.

अनुकूल - ६७ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.तानाजी खाडे** :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ ला पुढीलप्रमाणे ठराव मांडत आहे.

ठराव क्रमांक -२९२ विषय क्रमांक – ६

दिनांक - २०/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

**<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>**

दिनांक २८/०३/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब ,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता

अनुकूल - ६७ प्रतिकूल -

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

**मा.तानाजी खाडे** :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ ला पुढीलप्रमाणे ठराव मांडत आहे.

ठराव क्रमांक -२९३ विषय क्रमांक – ७

दिनांक - २०/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

**<u>मा.क्रिडा समिती</u>**

दिनांक ०६/०३/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब ,सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता

अनुकूल - ६७ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------

**मा.सुजाता पालांडे -** महापौर साहेब, विषय क्रमांक ८ ला पुढीलप्रमाणे ठराव मांडत आहे.

ठराव क्रमांक -२९४ विषय क्रमांक – ८
दिनांक - २० / ५ / २०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. दगुनि / १/कावि/ १७५/२०१३
दिनांक २०/०५/२०१३

सन २०१३-२०१४ च्या मंजूर अंदाजपत्रकास मा.महापालिका सभेने मान्यता दिलेली आहे. या अंदाजपत्रकामध्ये लहान मोठी अश्या सुमारे २१०० नविन विकास कामांचा समावेश आहे. सर्व कामांची विस्तृत अंदाजपत्रके तयार करणे, सक्षम समितीकडे प्रस्ताव सादर करणे, व सदर कामांना प्रशासकिय मान्यता घेणेकामी सुमारे तीन ते चार महिन्यांचा कालावधी लागणेची शक्यता आहे. सदर विकासकामांची निविदा प्रक्रिया तातडीने होणे आवश्यक आहे.

सबब सन २०१३-२०१४ च्या मंजूर अंदाजपत्रकातील नविन विकास कामांना मा.महापालिका सभेची प्रशासकिय मान्यता मिळाल्यास या कामांसाठी लागणारा कालावधी कमी होणार आहे. सबब मा.महापालिका सभेमार्फत नविन कामांना प्रशासकिय मान्यता मिळाल्यास मा.आयुक्त स्तरावर कामांची छाननी करुन निविदा कार्यवाही हाती घेता येईल.

सबब सन २०१३-२०१४ च्या मंजूर अंदाजपत्रकात नमूद केलेप्रमाणे नविन विकास कामांना मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळुंके** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रथम मी आयुक्तांचे अभिनंदन करतो. जो काही ३ / ४ महिन्यांचा कालावधी लागणार आहे, तो विचारात घेऊन सर्व सदस्यांची मागणी लक्षात घेता आपल्या प्रभागातील छोटी मोठी कामे लवकरात लवकर व्हावी यासाठी आयुक्तांनी आग्रह केल्यानंतर अजित दादांनी सांगितल्याप्रमाणे कोणतेही काम थांबले नाही पाहिजे. त्याचप्रमाणे हा विषय १के

खाली ठेवल्याबददल मी त्यांचे अभिनंदन करतो व सभागृहाला हा विषय मंजूर करावा अशी विनंती करतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरे पाहता मागील दोन टर्ममध्ये आर्थिक वर्षात अशा प्रकारची ढोबळ प्रशासकीय मंजूरी देण्याचे काम महासभेने केलेले आहे. सूचना केलेली आहे. यांच्या त्यांच्या आयुक्तांच्या मनात काय शंका-कुशंका होत्या ते कळत नाही. परंतू उशीरा का होईना, आत्ता प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर आम्ही आमची जबाबदारी पुर्ण केली आहे. सगळी कामे करायची जबाबदारी प्रशासनावर आहे, आयुक्तांची आहे. पुन्हा आयुक्तांनी म्हणू नये, ही सभागृहाची जबाबदारी आहे. आम्ही आमची जबाबदारी समजून मान्यता दिली आहे. आता प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता पावसाळ्यापूर्वीची कामे आर्थिक दृष्टीने, विकासाच्या दृष्टीकोनातून महत्वाची आहेत. महत्वाच्या विषयाला मान्यता दिली आहे. प्रशासकीय कामे रितसर, वेळेवर करुन घेणे ही आपली जबाबदारी आहे. आवर्जून सांगू इच्छितो, आता ही जबाबदारी प्रशासनाने चांगल्या पद्धतीने पार पाडावी.

**मा.श्रीरंग बारणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब खरे तर २०१३ पुर्वी हा विषय मंजूरीसाठी आला होता. त्याला प्रशासकीय मंजूरी देतोय. आज आयुक्त सुद्धा नाहीत. १के खाली विषय घेतला आहे. दोन महिन्यांनंतर आयुक्तांना कळायला लागले. सभागृहात एवढे मोठे विषय होत असताना आयुक्त इथे उपस्थित नाहीत. गेले वर्षभराचा कालावधी पाहिल्यानंतर विकास कामांच्या दृष्टीकोणातून आयुक्तांनी कोणतेही ठोस पाऊल उचलले नाही. मार्चमध्ये सभागृहात अंदाजपत्रकाला मंजूरी मिळाल्यानंतर आत्ता मे मध्ये वन के खाली आयुक्तांनी विषय दाखल केला आहे. या गोष्टीचे समर्थन मी करणार नाही. आयुक्त या सभागृहात उपस्थित असायला पाहिजे होते. प्रामुख्याने आयुक्तांच्या कामाचा शोध त्या विषयाच्या अनुषंगाने घ्यायचा आहे. एकीकडे विकास कामे होत नाहीत हे सभागृहात सन्मा.सदस्य बोलतात. दुसरीकडे विषयाला विरोध केलातरी विरोध करतो म्हणून सांगतात. विकास कामे ठप्प झाली आहे हे तुम्ही मान्य केलेले आहे. सन्मा.आयुक्त सभागृहात असते तर त्यांनी

खुलासा केला असता. ते अतिशय चांगल्या पद्धतीने खुलासा करतात. गेल्या महापालिका सभेच्या वेळी पाहिले होते, पुढील मिटींगमध्ये यासंदर्भात शहरात विकास कामे ठप्प झाली आहेत. बरीचशी कामे करत असताना फाईल टेबलवर फिरत असतात. जरी त्यासाठी अधिका-यांना स्वायत्तता दिली असलीतरी कामे होत नाहीत. हे प्रामुख्याने इथे सांगावे लागेल. एकत्रितपणे जवळपास २,००० कोटींवरील विषयाला मंजूरी देत असताना, कोणत्या अंदाजपत्रकाला मंजूरी देतोय, ख-या अर्थाने चुकीच्या पध्दतीने निविदा प्रक्रियेचे काम होऊ नये हे पाहिले पाहीजे. आयुक्तांच्या कानावर या गोष्टी घातल्या गेल्या पाहीजेत. भविष्यात चुकीच्या पध्दतीने कामे पार पडू नयेत. भविष्यात मंजूरी देत असताना चुकीच्या कामांवर जास्त बोलतो. आयुक्त असताना विषयाला मंजूरी दिली असती तर बरे झाले असते. माझे सहकारी मा.योगेश बहल, मा.प्रशांत शितोळे बसले आहेत. विषयाला मंजूरी देत असताना त्यांचे समर्थन करणार नाही, परंतू भविष्यात चुकीची कामे होऊ नये हे प्रामुख्याने सांगतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६७ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - महापौर साहेब ,विषय क्रमांक ९ ला पुढीलप्रमाणे ठराव मांडत आहे.

ठराव क्रमांक - २९५ विषय क्रमांक – ९

दिनांक - २०/५/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. पअक/६/कावि/ ४६५/२०१३
दिनांक २०/०५/२०१३

पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातून पवना, मुळा, इंद्रायणी या नद्या वाहत असून या नद्यांच्या पात्रात मोठ्या प्रमाणात राडारोडा, भराव तसेच तात्कालीन

शेतजमिनीच्या सिंचनासाठी बांधलेले बंधारे यामुळे नदीच्या वहनक्षमतेमध्ये मोठ्या प्रमाणात अडथळा होत आहे. पावसाळ्याव्यतिरिक्त नदीमध्ये प्रदूषीत पाणी साठून राहिल्याने तसेच त्यामुळे नदीपाण्यावर मोठ्या प्रमाणात जलपर्णीची वाढ होत असल्याने पर्यायाने डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणात होत असल्याने नदीपात्राच्या परिसरात अनारोग्याची स्थिती निर्माण होत आहे. या सर्व बाबी लक्षात घेता नदीपात्र स्वच्छ करुन पुररेषेची तिव्रता कमी करणे बाबत उपाययोजना ठरविणेसाठी पाटबंधारे विभागाच्या वरिष्ठ अधिका-यांसमवेत दि.०३/०५/२०१३ रोजी पुर्ण नदीची पाहणी करणेत आली असून त्यांनी दिलेल्या निरीक्षण अहवालानुसार पवना नदीसाठी खालिल प्रमाणे उपाययोजना करणेचे सुचविणेत आलेले असून यावर मा.उपमुख्यमंत्री महोदय यांचे समवेत झालेल्या दिनांक १९/०५/२०१३ चे बैठकीमध्ये मनपाचे सर्व मा.आमदार, पदाधिकारी यांचे उपस्थितीत झालेल्या चर्चेमध्ये तत्वतः मान्यता मिळालेली असून त्याप्रमाणे तातडीने उपाययोजना करणेच्या सुचना आहेत. यामध्ये पवना नदी पात्रातील बंधा-याविषयी खालील उपाययोजना पाटबंधारे विभागाने सुचविलेल्या आहेत.

| **अ. क्र.** | **बंधा-याचे नांव** | **पाटबंधारे विभागाची निरीक्षणे** | **पाटबंधारे विभागाने सुचविलेली उपाययोजना** |
|---|---|---|---|
| १ | रावेत बंधारा | ७० ते ९० वर्ष जुना सॉलिड दगडी बंधारा २ मिटर उंच दगडी बांधकाम असल्याने वरच्या बाजूस गाळ साठलेला आहे. | बंधा-यातील गाळ वाहून जाऊन नदीपात्र स्वच्छ राहणेसाठी पुणे येथिल बोट क्लब बंधा-याचे धर्तीवर लोखंडी गेट असणारा बंधारा बांधणे आवश्यक आहे. |
| २ | केजूबाई बंधारा, थेरगांव साखळी क्र. २८/३५० मि. | ७० ते ९० वर्ष जुना दगडी सॉलिड बंधारा १०२ मि. लांब व २ मिटर उंच गाळ वाहून जाण्यासाठी उपाययोजना नसल्याने मोठ्या प्रमाणात गाळ साठलेला आहे. | बंधा-याची उंबरठा पातळी नदी पात्राच्या तळ पातळीपर्यंत खाली ठेवून त्यासाठी लोखंडी गेट बसवणे आवश्यक आहे. जेणेकरुन पावसाळ्यात पुर्ण गाळ वाहून जाऊन बंधारा स्वच्छ राहील. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | पदमजी बंधारा साखळी क्र. २८/९५० | १९५८ मध्ये बांधलेला सॉलिड कमी उंचीचा बंधारा सध्या पदमजी कंपनी व बिर्ला हॉस्पीटल साठी पाणी उचलले जाते. | पवना प्रकल्पातून नियमित पाणी सोडण्यात येत असल्याने बंधा-याची आवश्यकता नसल्याने तोडणेस हरकत नाही. |
| ४ | चिंचवड मोरया गोसावी बंधारा साखळी क्र. २९/७९० मिटर | लघूपाटबंधारे विभागा तर्फे १० वर्षापूर्वी बांधला असून कोल्हापुर पध्दतीचा आहे. पूर्ण लांबीत गेट असल्याने गाळ साठलेला नाही. | सदरचा बंधारा बोटींगसाठी मनपाने बांधून घेतल्याने आवश्यकतेनुसार गेट बसवून पाणी आडवता येते. पात्रातील राडारोडा काढून पात्र स्वच्छ करणे आवश्यक आहे. |
| ५ | मिलिटरी डेअरी फार्म बंधारा, पिंपळे सौदागर साखळी क्र. ३७/०८० मिटर | नदीपात्रात भरीव दगडी बांधकाम असून लहान २ गेट वरच्या बाजूस आहेत बंधा-यात मोठ्या प्रमाणात गाळ, पानवनस्पती साठल्याने पुराचे प्रवाहास मोठा अडथळा होऊन प्रदुषणही मोठ्या प्रमाणात होत आहे. | मिलिटरी डेअरी फार्म यांच्या पाण्याची पर्यायी व्यवस्था करुन सदरचा बंधारा (छोटा डोह ठेवून) काढून टाकणेत यावा यासाठी मनपाने संमती मिळवावी नदीपात्रातील खडक काढणेत यावा. |
| ६ | सांगवी बंधारा साखळी क्र. ४३/२०० मिटर | लहान उंचीचा जुना सॉलिड बंधारा असून १/२ कि.मी वरील बाजूस नर्मदा गार्डन हॉल जवळ आणखी एक लहान बंधारा असून दोन्ही बंधारे पूर्णपणे अकार्यक्षम असल्याने मोठ्या प्रमाणात गाळ साठलेला आहे. | दोन्ही लहान बंधा-याची उपयुक्तता संपलेली असल्याने दोन्ही बंधारे काढून टाकावेत. |
| ७ | पवना नदी पात्र | नदीपात्रातील उघडे, प्रवाहास अडथळा करणारे खडक मोठ्या प्रमाणातील गाळ काढणे आवश्यक | यासाठी अत्याधुनिक यंत्रणा, मशिनरी भाड्याने घेवून उपाययोजना करावी. नदीतील गाळ, राडारोडा जलपर्णी काढणेसाठी नेहमीच्या कामाकरिता पाण्यावर तरंगणारा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्लॅटफॉर्म असणारे पोकलॅन मशिन खरेदी करावे. |
| ८ | पवना, मुळा व इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प राबविणे | १ | मनपा क्षेत्रातील पवना, मुळा, इंद्रायणी नदीच्या पात्राच्या जागा देखभाल, दुरुस्तीकामी मनपाकडे हस्तांतरीत करणेसाठी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे मागणी केली आहे. | १ | नदीपात्राची जागा महसूल विभागाकडे असल्याने त्यांचेकडून देखभाल, दुरुस्तीकामी म.न.पा. ने हस्तांतरीत करुन घ्यावी. |
| | | | | २ | नदीतील पूर विसर्गाचा जलशास्त्रीय अभ्यास मध्यवर्ती संकल्पाचित्र संघटना, नाशिक यांचे तर्फे करुन घेवून आवश्यक उपाययोजना कराव्यात. |
| | | २ | पवना नदी सुधार प्रकल्पाचा फिजीबीलीटी रिपोर्ट महाराष्ट्र शासनातर्फे केंद्र शासनाच्या NRCD कडे मंजूरीकामी सादर करणे. | ३ | नदीसुधार प्रकल्पाचे प्रस्ताव / आराखडे जलसंपदा विभाग पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन व प्रदुषण नियंत्रण मंडळास मंजूरीस्तव सादर करावेत. |
| | | | | ४ | नदीपात्राची मोजणी करुन डिमार्केशन करणे आवश्यक आहे. |

उपरोक्त प्रमाणे शहरातील वाहणा-या नद्यां बाबत पाटबंधारे विभागाने सुचविले प्रमाणे नदीचे पात्र स्वच्छ करुन नदीची प्रवाह क्षमता वाढविणे ,प्रदुषित पाणी साठून राहत असल्याने अनावश्यक बंधारे ,गाळ ,राडारोडा काढणे आवश्यक बंधा-याची गेट बसवून सुधारणा करणे ,नियमित नदीपात्र स्वच्छ ठेवणेकामी कार्यवाही करणे ,इत्यादी आवश्यक उपाययोजना करणेसाठी व त्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळुंके** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.श्रीरंग बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय वाचल्यानंतर हे लक्षात आले असेलतर आपण पवना, मुळा, इंद्रायणी नदीपात्र स्वच्छ करण्याचा हा विषय आहे. पवना, इंद्रायणी या नदींच्या पात्रांची दुरावस्था झाली आहे. ही कशामुळे झाली. हे सभागृहाला माहिती आहे आणि शहरातील जनतेलाही माहित आहे. प्रामुख्याने याविषयात राडारोडा उचलणे, साफ करणे सभागृहाने अशी त्यामध्ये माहिती दिलेली आहे. महापौर साहेब मी या अनुषंगाने प्रामुख्याने तुम्हाला सांगतो की तुम्ही सुचना दिल्या पाहिजेत. नदीपात्रात जो राडारोडा ज्या व्यक्तीने टाकला असेल, ज्या भागात टाकला असेल हे पाहिले पाहिजे. या बाबतीत तुम्ही दखल घेतली पाहिजे त्याची मात्र चौकशी केली पाहिजे. एकिकडे नदीपात्रात टाकलेला राडारोडा पाहिला नाही त्यामुळे त्या दुर्दशामुळे नदीपात्र अरुंद झाले आहे. इथून पुढे निविदा प्रक्रिया करणा-यांनी याकडे डोळेझाक करु नका. प्रभाग कार्यालय किंवा मुख्य कार्यालयाच्या अधिका-यांनी, त्या विभागातील एक्झिक्युटीव्ह इंजिनिअर यांनी पाहीले नाही, लक्ष दिले नाही. त्यांचे दुर्लक्षामुळे नदीपात्र अरुंद झाले आहे. नंतर सभागृहात सातत्याने पूरनियंत्रण रेषेचा विषय काढला, तो का काढला. त्याची सुद्धा मुख्य कारणे शोधली पाहीजेत. आजचा विषय वाचला, त्यात आलेले आहे. नदीपात्रातील राडारोडा काढला नाही स्वच्छता पण केली नाही, का केली नाही. याठिकाणी गाळ साचला आहे असे अनेक सदस्यांनी सातत्याने या सभागृहात सांगितले आहे. मिलिटरी हद्दीतील बंधा-यातील घाण दूर करा. मोरया गोसावी मंदीराजवळची गेटवेल सुकली आहे. गाळ साठला आहे. या गोष्टींकडे प्रामुख्याने दुर्लक्ष केल्यामुळे त्या अनुषंगाने कोटयावधी रुपयाची निविदा प्रक्रिया होणार आहे. येथे महापालिकेच्या कार्यक्षेत्रात अशा पद्धतीने चुकीचे काम केले जाणार, या गोष्टीला माझा विरोध आहे. जलपर्णीचा इथे विषय आहे. जलपर्णी काढण्याच्या संदर्भात आज आपण पाहिले, पवनेचा परिसर पाहिला, इंद्रायणीचा परिसर पाहिला तर ज्या भागातून त्या वाहतात, प्रामुख्याने प्रभाग कार्यालयांनी किती जलपर्णी काढली. ज्यांचे वॉर्ड नदीपात्रालगत आहेत, या सभागृहात राजेंद्र जगताप व अन्य सदस्य सातत्याने मच्छरबाबत, जलपर्णीविषयी कितीवेळा बोलले आहे. नदीपात्र स्वच्छ होणार आहे का पूर येणार आहे. पावसाळयात निविदा प्रक्रिया करणार. जलपर्णी

काढायाची निविदा प्रक्रिया केल्यानंतर ही जलपर्णी आपोआप वाहून जाणार आहे. झुरे साहेब तुम्हाला मोठा अनुभव आहे. खरेतर सांगतो माझ्या माहितीप्रमाणे हे चुकीच्या पध्दतीने काम चालले आहे. आयुक्तांना इतक्या दिवसांत समजले नाही. महापालिकेमध्ये सदस्यांनी जलपर्णीबाबत किती वेळा हा विषय काढला होता. महापौरांना माहित नाही का. नदीपात्रामध्ये राडारोडा काढण्याबाबत तक्रारी आल्या नाहीत का. त्यांची आयुक्तांना काय दखल घेतली. खरेतर आयुक्त या सभागृहामध्ये पाहिजे होते. हे काम पेपरमध्ये न देता त्यांना पर्सनली दिले जाते. जे नागरिक नदीपात्रालगत जवळपास राहतात त्यांना किती हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. खरेतर या विषयाला माझा विरोध नाही. विषय करत असताना ज्या चूका आपण केलेल्या आहेत. त्यासाठी महापालिकेच्या तिजोरीतला पैसा जाणार आहे. वनके खाली विषय घेतला आहे. जूनमध्ये पाऊस चालू होणार आहे. आयुक्तांना १के खाली विषय दाखल केलेला आहे. या अनुषंगाने बैठक झाली असे लिहीले आहे. यात कळले नाही का कोणीतरी सांगायचे स्वतःला काही करता येत नाही म्हणून सभागृहाकडून विषय मंजूर करुन घेतल्यानंतर विषयाला मंजूरी घेता येत नाही. पवना, इंद्रायणी किती दिवसांत साफ होणार आहे. त्याचे उत्तर दिले गेले पाहीजे. केवळ निविदा प्रक्रियेसाठी होणार असेलतर त्याला माझा विरोध आहे. चुकीच्या पद्धतीने नदीपात्र अरुंद करायचे काम अनेक दिवस केले जाते का. सभागृहाची दिशाभूल केली जाते आहे. विषय मंजूर झाल्यानंतर निविदा प्रक्रिया कधी होणार, काय काम करणार. नदीपात्रातील जलपर्णी कशी काढणार? राडारोडा कसा काढणार? त्याच्या संदर्भात काय करणार आहोत? अंदाजपत्रकाच्या सभेवेळी अनेक ज्येष्ठ सदस्यांनी सांगितले होते, नदीपात्र बांधण्यासंदर्भात कारवाई केली गेली पाहीजे. भविष्यात नाहक खर्च वाया जाता कामा नये. नदी पात्र बांधल्यानंतर प्रामुख्याने लोकांसाठी रस्ता होईल त्यामुळे नदीपात्र स्वच्छ राहणार नाही. गाळ काढला जाणार नाही. ही प्रक्रिया सातत्याने सांगत आलेलो आहे. वन के खाली विषय दाखल होतो. मंजुरी मिळत असताना आपल्याला सर्व गोष्टी माहीत होत्या. केवळ फार्स केला जातो. त्याने नदीपात्र स्वच्छ केले जाणार का? पूरनियंत्रण रेषेची पातळी ठरवणार. ही पातळी ठरवायला पवार साहेबांनी सांगितले होते. ६/७ महिन्यांपूर्वी विषय

यायला पाहीजे होता. ६/७ महिने झोपले होते का? कोणीतरी सांगितले म्हणून विषय घेतला असेलतर प्रशासकिय लेवलवर कळत नसेल, आयुक्तांना, प्रशासनाला कळत नसेल, सांगितल्यावर विषय येत असेल तर ही दुर्भाग्याची गोष्ट आहे. आपण काय काम करणार आहात हे देखील सभागृहाला कळू द्या, धन्यवाद!

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज याठिकाणी खरे तर वनके खाली या विषयास मा.महापौर, सदस्यांना या विषयाची पूर्ण माहिती नसताना हा विषय सभागृहात आला आहे. आताच आमचे आप्पा बारणेंनी सांगितले म्हणून विषय सभागृहात येत असेल तर की या विषयाला याठिकाणी मी विरोध करते. मा.महापौर साहेब याठिकाणी एकूण ८ सूचना मांडलेल्या आहेत. ८ सूचनांमध्ये रावेत बंधारा, केजूबाई थेरगाव बंधारा, पदमजी बंधारा, चिंचवड मोरया गोसावी बंधारा, मिलिटरी डेअरी फार्म बंधारा पिंपळे सौदागर, सांगवी बंधारा,पवना नदी पात्र व पवना,मुळा व इंद्रायणी नदीसुधार प्रकल्प राबविणे हे यात आहेत. सभागृहात ज्यावेळी बजेटला या विषयासंदर्भात मान्यता देत होतो, त्यावेळी सांगितले होते, त्याच्या आजूबाजूच्या जागेत सुशोभिकरण करायचे असेल, वेगवेगळे प्रकल्प राबविणार असू तर ही जागा पहिल्यांदा ताब्यात येणे महत्वाचे आहे. पहिले प्रकल्पासाठी मंजूरी घेऊ नंतर काय करायचे ते करु. आज नेमके या विषयाला पुणे पाटबंधारे खात्याने कळवले आहे, पात्राची जागा देखभाल दुरुस्तीकामी महापालिकेकडे हस्तांतरीत करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे मागणी केलेली आहे. नदीपात्र महसूल विभागाकडे असल्यामुळे ते महापालिकेकडे हस्तांतरीत करण्यात यावे. नदी पात्रातील निसर्ग, जलशास्त्रीय अभ्यास करण्यासाठी नारी या संस्थेकडे काम देऊन आवश्यक उपाययोजना करण्यात यावी. नारी ही नाशिकची संस्था, भारत सरकारची संस्था असल्यामुळे पहिल्यांदा पूररेषेची आखणी केली त्यावेळी पाटबंधारे खाते, पुणे यांना काम न देता यांना द्यायला पाहीजे होते. म्हणून वारंवार पूररेषेचा विषय इथे आणतो. पाटबंधारे, पुणे खाते चुकीचे समजत असेल, पूररेषा आखली असेल तर आपले १/२ कोटींचे टेंडर परत करणार आहेत का? पवना नदी सुधार प्रकल्प याचा रिपोर्ट महाराष्ट्र शासनाने एन.आर.सी.टी.कडे सादर करणे,

आयुक्तांनी नदी सुधार प्रकल्पाचा प्रस्ताव व आराखडा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे चर्चेसाठी सादर करणे, नदी पात्राचे डिमार्केशन करणे आवश्यक आहे. आत्ताच दीड महिन्यापूर्वी नगररचना विभागाने डिमार्केशन करायचा प्रकल्प हाती घेतला आहे. निविदा प्रस्ताव केलेला आहे. त्याची मी माहिती घेतला. वरवर डिमार्केशन करणार म्हणजे नेमके काय करणार? पाटबंधारे खात्याने नकाशा दिला. त्यात तसूभर सुद्धा बदल करणार नाही. फक्त फिजिकली डिमार्केशन करणार आहेत असे सांगितले. वेगवेगळे दोन मुद्दे आहेत. एकिकडे म्हणतात, नारीकडून पूररेषा आखून घ्या. दुसरीकडे सांगता, डिमार्केशन करुन घ्या. पाटबंधारे पुणे, खात्याला नेमके कळत नाही काय केले पाहीजे. नियम असले तरी वारंवार पूररेषेबद्दल बोलले जाते. काहीजण हिरो होण्याचा प्रयत्न करतात. बरोबरही आहे. त्यांच्या नदीपात्रालगतच्या जागा टीडीआरमध्ये अडकल्या आहेत. त्यांना बाजू मांडायचा निश्चित अधिकार आहे. एखाद्याने वारंवार जीव तोडून बोलण्यापेक्षा रेड लाईन, ब्ल्यू लाईन आखण्यासंदर्भात कार्यवाही का करत नाही? कशासाठी विषय वारंवार पालकमंत्र्यांकडे जातो. सभागृहाचा उगाचच वेळ वाया जातो. बंधारा काढायची सूचना खरेतर अभिनंदनीय आहे. इतक्या दिवसांत पाटबंधारे, पुणे खात्याला कसे कळाले नाही. पाणी थांबल्यामुळे जलपर्णी वाढली आहे. उशीरा का होईना शहाणपण सूचले आहे. नारी संस्थेकडून काम करुन घेणार आहोत. ते कसे करुन घेणार त्याचा खुलासा द्यावा. नदीपात्राचे डिमार्केशन करुन घेणार म्हणजे नेमके काय करुन घेणार? हे सुद्धा आयुक्त साहेबांनी सभागृहाला सांगावे.

**मा.भदाणे** **(उपसंचालक,नगररचना विभाग)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, त्यांनी आत्ता जो प्रश्न विचारलेला आहे, **as per revenue rule** नदीपात्राचे डिमार्केशन करायचा विषय स्थापत्य विभागाने काढला आहे. काही ठिकाणी आखून झाले असले तरी नदीचे पात्र डिझाईन झाल्यानंतर रेड लाईन व ब्ल्यू लाईनचे मार्किंग करणार आहोत. नेरी, नाशिक **(National Environment Engineering Research Institute)** या संस्थेबद्दल मला माहिती आहे, त्यानुसार त्यांच्याकडून पूररेषा, ब्लू लाईन याचा अभ्यास करुन घेणार आहोत. पाटबंधारे विभाग, पुणे यांनी पूररेषा केलेली आहे. हे

बंधारे काढल्यानंतर काय फरक पडेल याचा अभ्यास करण्यासाठी त्यांच्याकडून रिपोर्ट घेऊन मग ते फायनल करणार आहोत.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६७ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.महापौर – सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/५१३/१३
दिनांक – ३१/०५/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.